


नाशिक : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नाशिक व गौतमी प्रकाशन यांच्यातर्फे लेखक डॉ. गिरीश जाखोटिया यांच्या 'स्टोरी ऑफ ए मारवाडी' या ई-बुकचे प्रकाशन करताना अतुल चांडक. शेजारी संजय पेठे, विश्वास ठाकूर, श्री. जाखोटिया, सारिका देशमुख आदी.

# संपत्तीनिर्मितीत मारवाडी समाज अव्वल

## डॉ. जाखोटिया : 'स्टोरी ऑफ मारवाडी'चे प्रकाशन

**नाशिक, ता. २५ :** भारताला संस्कृतीची एक परंपरा आहे. त्याचबरोबर भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात उद्योजकता आहे. या उद्योजकतेत मारवाडी समाजाची भूमिका महत्त्वाची आहे. राष्ट्रहितासाठी लागणाऱ्या संपत्ती निर्मितीत मारवाडी समाजाचा सक्रिय सहभाग आहे. त्यामुळे या समाजाला संपूर्ण जग सलाम करीत आहे, असे प्रतिपादन डॉ. गिरीश जाखोटिया यांनी केले.

गंगापूर रोड येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात गौतमी प्रकाशन संस्था व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या व त्यांनी लिहिलेल्या 'स्टोरी ऑफ मारवाडी' या पुस्तक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी 'बदलती परिस्थिती आणि लोकांसमोरील आव्हाने' या विषयावर ते बोलत होते. या वेळी प्रतिष्ठानचे विश्वस्त विश्वास ठाकूर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस अतुल चांडक, गौतमी प्रकाशन संस्थेच्या संचालिका सारिका देशमुख, माय विश्व संकेतस्थळाचे संजय पेठे आदी व्यासपीठावर होते.

या वेळी डॉ. जाखोटिया म्हणाले, की तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे व्यापार, शिक्षण, भांडवल आदी सर्वच स्तरांतून जग जवळ येत आहे. त्यामुळे मतांतर, सत्तांतरात बदल होत आहेत. दोन शतकांत जो बदल झाला नाही, तो बदल गेल्या दोन दशकांत झाला आहे. ही किमया तंत्रज्ञानाची आहे. त्यामुळे बदलत्या वातावरणात भारतीयांची भूमिका काय असेल, याचाही भारतीयांनी विचार करावा. कारण, भारतीयांना भ्रष्टाचारातून मुक्त व्हायचे आहे. सध्याच्या नवीन पिढीला बदलाची समजूत आहे. त्यामुळे या भ्रष्ट प्रक्रियेत या पिढीला बदल अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. विश्वास ठाकूर यांनी आपल्या मनोगतात, 'स्टोरी ऑफ मारवाडी' या पुस्तकाचा इंग्रजी भाषेत अनुवाद केल्याने मारवाडी समाजाची ओळख जागतिक स्तरावर होईल, असा विश्वास व्यक्त केला.